
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय पंधरावा , भाग पहिला

**सुलभ ओवीबद्ध रचना**



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय पंधरावा : भाग पहिला

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

©श्री विजय पांढरे(२०१२)

**या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.**

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

|| ॐ परमात्मने नम: ||

## अध्याय पंधरावा

# पुरुषोत्तमयोग

आता ह्रदय आपुले । शुद्ध करुनिया भले । त्यावर बसवू पाऊले । श्रीगुरूंची ||१||
ऐक्यभाव अनुभवणं । तेच फुलांचे अर्पण । ओंजळभर फुले देणं । तेचि अर्घ्य ||२||
अनन्यता अंतरी अनुभवणं । तेचि वासना निर्दालन । तेचि लावणे बा चंदन । श्रीगुरुंना ||३||
प्रेमाच्या त्या सोन्यानं । वाळ्यांना बा मढवून । करू तोरड्या अर्पण । श्रीचरणा ||४||
ऐशा अव्यभिचारी भक्तीने । ऐक्यता ती अनुभवणे । तेचि जोडवी घालणे । श्री बोटांना ||५||
आनंदरुपी ऐसे फळ । सात्त्विक ते कमळ । उमललेलं अष्टदळ । वर ठेवू ||६||
अहं धूप तेथे जाळू । सोऽहं तेजे ओवाळू । सामरस्ये पोटाळू । निरंतर ||७||
तनु आणि प्राण । यांच्या खडावा करून । मोक्षही तो ओवाळून । टाकू तेथे ||८||
सेवा ऐसी करणं । तीच पात्रता बा पावणं । तेव्हाच मग ज्ञान । प्राप्त होते ||९||
ब्रह्ममयतेच्या कारण । ज्ञानाचे होता प्रकटन । शब्द ते अमृत होऊन । वर्षती तेव्हा ||१०||
करोडो चंद्र टाकावे ओवाळून । ऐसे वक्तृत्व असाधारण । इतकी गोडी ती असणं । शब्दांना त्याच्या ||११||
जसे सूर्याच्या कारण । प्रकाशाचं ते पसरणं । तैसे ज्ञानाचे प्रकटन । शब्दांनी त्याच्या ||१२||
नादब्रह्मही खुजे । कैवल्यही तैसे न सजे । ऐसे वत्कृत्व देखिजे । तयाच्या ठायी ||१३||
श्रवणसुखाच्या मांडवात । बहरला जसा वसंत । तैसी असे फुलत । वाणी तयाची ||१४||
ठाव न पावता जयाचा । मनासह विरते वाचा । तेव्हा देव या शब्दाचा । समजतो अर्थ ||१५||
श्रवण वाचना न समजे । साधनेस ही न उमजे । ऐसे अगोचर ते पाविजे । विरता मन ||१६||
ऐसे भाग्य अकल्पित । प्रकटते त्या वाचेत । अनंत त्या गुरुकृपेत । शक्ती आहे ||१७||
आता बहु काय बोलणे । कोठेही ऐसे न घडणे । प्रेम ते आईप्रमाणे । श्रीगुरूंचे अर्जुना ||१८||
जैसे एकुलत्या अपत्यावर । आईचे प्रेम अपार । तैसे प्रेम ते माझ्यावर । श्रीगुरूंचे अर्जुना ||१९||
जसं त्या मेघानं । चातकांवर वर्षा करणं । तैसे प्रेम श्रीगुरूकारण । लाभले मला ||२०||
म्हणून रिकामे जरी तोंड । करू गेले ती बडबड । प्रकटले रहस्य ते गोड । गीते जैसे ||२१||
असता मनुष्य भाग्यवान । वाळूचेही होते रत्न । जसे परीसाच्या स्पर्शानं । सोने होई ||२२||
येता भगवंताच्या मनात । खडेदेखील तांदूळ होतात । पडे विषाही होणे अमृत । कृपा होता ||२३||
श्रीगुरूंच्या कृपेने । संसारही मोक्ष होणे । श्रीगुरूंनी ते अंगीकारणे । फलदायी अर्जुना ||२४||
प्रसन्न होता नारायण । कैसे पडेल काही उणं । पहा अवघी ती पुराणं । ग्वाही देती ||२५||
तैसे श्री निवृत्तिराजे । उतरविले अज्ञान ओझे । आणि आणले मन माझे । ज्ञानाच्या गावा ||२६||
परि असो हे बोलणं । मन भरून येतं आनंदानं । श्रीगुरूंचे करण्या वर्णन । सीमा कैसी ||२७||
तयाच्याच कृपेकारण । तुम्हा संता मी सांगेन । गीतेतील ती वचनं । विस्तारून आता ||२८||
चौदाव्याच्या अंती । निर्णय केला कैवल्यपती । तोच आता प्रस्तुती । ऐकू या आपण ||२९||
लाभता बा ते ज्ञान । मुक्तीचं प्राप्त होणं । जसे लाभता इंद्रपण । लाभे संपत्ती ||३०||



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

शेकडो घेऊन जन्म । करता ते ब्रह्मकर्म । मगच मोक्षाचे वर्म । येते हाता ॥३१॥
जसा सूर्यप्रकाश तो । डोळसालाच लाभतो । तसा मोक्षलाभ होतो । ज्ञानिया फक्त ॥३२॥
प्राप्त होण्या हे ज्ञान । योग्य तोचि जाण । विरक्त ज्याचे मन । जाहले अर्जुना ॥३३॥
पाताळातील ते धन । दावितसे ते अंजन । परि तेथे पायाळू असणं । अनिवार्य की ॥३४॥
मोक्षलाभ घडविते ज्ञान । यात शंकाच ती नसणं । पण शुद्ध मनावीण । ज्ञान कैचे ॥३५॥
त्या बा विरक्ती वाचून । प्राप्त होत नसे ज्ञान । आहे सांगितलं भगवंतानं । गीतेमाजी ॥३६॥
त्या विरक्तीची प्राप्ती । होतसे कवणे रिती । विरक्तीविना प्रचीती । नाही अर्जुना ॥३७॥
विषयुक्त असे अन्न । ऐसे जेवणाऱ्या ठाऊक होणं । मग ताट बाजूस सारणं । तैसे अर्जुना ॥३८॥
तैसी संसाराची समस्त । अनित्यता जाणता अंतरात । वैराग्य असे प्रकटत । जीवनी अर्जुना ॥३९॥
आता पंधराव्या अध्यायात । काय असे अनित्य । वृक्षाचा तो दृष्टान्त । ऐकावा अर्जुना ॥४०॥
झाड पहा उपटून । ठेवता उलटे करून । जाते ते सुकून । तैसे हे नव्हे ॥४१॥
वृक्षाचा दृष्टान्त देऊन । रुपकाच्या त्या मदतीनं । सांगितलं जन्ममरणाचं निवारण । भगवंताने ॥४२॥
व्यर्थता मनइंद्रियांची जाणून । ब्रह्ममय ते होणं । तयाचे ते वर्णन । पंधराव्यात ॥४३॥
अध्यात्माचे रहस्य गहन । तेच आता मी सांगेन । लक्ष ते एकाग्र करून । ऐकावे तुम्ही ॥४४॥
जयाच्या कृपेकारण । जन्ममरणातून सुटणं । ऐसे तो भगवान कृष्ण । बोलता झाला ॥४५॥
प्राप्त होण्या ज्ञान । जी आहेच मोठी अडचण । त्या विश्वाभासा घे समजून । अर्जुना तू ॥४६॥
विश्व जे दिसतं डोळ्यांना । तो साराच भास अर्जुना । अश्वत्थ वृक्षाचा धिंगाणा । फोफावला येथे ॥४७॥
सामान्य वृक्षाप्रमाणं । फांद्या वर मुळे खाली नसणं । म्हणून या वृक्षा समजणं । कठीण अर्जुना ॥४८॥
तोडता वा जाळता बुंध्यातून । प्रचंड वृक्ष जातसे कोलंडून । जाई सहज बा वाळून । अनायासे ॥४९॥
तुटता त्या बुंध्यातून । झाड जात असे पडून । तसं विश्वाभासाचं संपणं । सोपं नाही ॥५०॥
सांगतो अश्वत्थाचे कौतुक । जे झाड बा चमत्कारिक । विस्तार त्याचा अधोमुख । असे अर्जुना ॥५१॥
जसा सूर्य अती उंचीवर । पण पसरे किरणजाळ सर्वदूर । तसा संसाराचा विस्तार । आहे अर्जुना ॥५२॥
जसे प्रलयकाली पाण्याने । सर्व आकाशा व्यापणे । तसे या संसारवृक्षाने । व्यापले विश्व ॥५३॥
जसा सूर्य जाता मावळून । सर्वत्र अंधाराचं ते दाटणं । तसा आहे विश्व व्यापून । अश्वत्थ अर्जुना ॥५४॥
यासी ना फळ चाखिता । ना फुल बा वास घेता । अतिगहन आकळू जाता । वृक्ष हा अर्जुना ॥५५॥
याचे मूळ वरच्या बाजूला । पण नाही हा उपटलेला । निरंतर हिरवा बहरलेला । सदैव अर्जुना ॥५६॥
याची मुळे असती वरती । अत्यंत अशी दाट ती । आणि खालीही असंख्य असती । मुळे याला ॥५७॥
जसं अमाप वाढणारं गवत । वड वा पिंपळ असे विस्तारत । जेथे पारंब्यांनाही फुटतात । फांद्या अर्जुना ॥५८॥
तैसे असे खाली वर । अर्जुना फांद्याचा विस्तार । आश्चर्य वाटते फार । पाहता याला ॥५९॥
जिकडे पहावे तिकडे । शाखाच दिसती चहुकडे । ऐसा चौफेर बा वाढे । अश्वत्थ अर्जुना ॥६०॥
पालवी फुटली गगनाला । की वाराच वृक्ष होऊन आकारला । अवस्थात्रयीचा उदय झाला । जसा अर्जुना ॥६१॥
ऐसा प्रकार हा गहन । विश्वाकार बा होऊन । वृक्ष प्रकटला जाण । ऊर्ध्वमूळ ॥६२॥
आता ऊर्ध्व ते कवण । मुळांची काय लक्षणं । कैसे बा अधोमुखपण । वृक्षाचे या ॥६३॥
अर्जुना या वृक्षास ती । मुळे कैसे असती । आणि कैशा त्या वाढती । तयाच्या फांद्या ॥६४॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

अश्वत्थ या नावानं । याने कैसे प्रसिद्ध होणं । तयाचे ते वर्णन । ऐकावे आता ॥६५॥
आता ऐसे मी बोलेल । जे सर्व तुला समजेल । सोप्या शब्दांत मी सांगेल । ज्ञान अर्जुना ॥६६॥
अर्जुना तू भाग्यवान । घे सर्व हे ऐकून । सर्वांगाचे करून कान । ऐक आता ॥६७॥
ऐकून भगवंताचं बोलणं । अर्जुना प्राप्त झाले अवधान । मग लक्ष ते देऊन । लागला ऐकू ॥६८॥
अर्जुनाचे प्रचंड श्रोतेपण । जसे आकाशा दिले आलिंगन । मग थेकुलं देवाचं वाटणं । निरूपण तेथे ॥६९॥
श्रीकृष्णोक्तीसागरा । हा अगस्तीच बा दुसरा । ज्ञानाचा घेऊ पाहे एकसरा । घोट तेथे ॥७०॥
उत्कंठा अर्जुनाची पाहून । संतोषला तो भगवान । नि मग पाहिलं प्रेमभावानं । अर्जुनाकडे ॥७१॥
मग भगवंत ते म्हणाले । ब्रह्मालाच ऊर्ध्व आहे म्हटले । संसारवृक्षामुळेच ब्रह्म ठरले । ऊर्ध्व अर्जुना ॥७२॥
एऱ्हवी मध्य ऊर्ध्व अध । हे नाहीत जेथे भेद । घेणे त्या ब्रह्माचा वेध । ते ज्ञान अर्जुना ॥७३॥
कानाशिवाय बा नाद । नाकाशिवाय तो सुगंध । विषयावीण पहा आनंद । स्वरूप ज्याचे ॥७४॥
स्वयेचि अलीकडे की पलीकडे । मागे अथवा पुढे । कर्त्याशिवाय कर्म घडे । ऐसे ब्रह्म अर्जुना ॥७५॥
कार्यकारणा कारण । होते वृक्षाचे प्रकटन । नामरूपाचं ते होणं जाणं । वृक्ष अर्जुना ॥७६॥
<u>ज्ञाता ज्ञेयावीण । नुसतेच बा ज्ञान । ते जाणीवरुपी गगन । स्वरूप त्याचे</u> ॥७७॥
जेथे प्रकटते कार्यकारण । नाही दुजे वा एकपण । जे जाणते आपल्या आपण । ते ब्रह्म अर्जुना ॥७८॥
ऐसे वस्तू जे साचे । ते ऊर्ध्व गा या तरूचे । त्यातून अंकुरणे मुळाचे । आहे अर्जुना ॥७९॥
माया ऐसी ख्याती । नसेच जी अर्जुना ती । का वांझेची संतती । तैसीच बा ॥८०॥
ती सत् ना असत् । बुद्धीस नाही समजत । नसे विचारांच्या आवाक्यात । ती अनादि अर्जुना ॥८१॥
नाना तत्त्वांची पेटी । जसे अभ्र आकाशी उठी । गुण आकार या गोष्टी । माये कारणे ॥८२॥
ते बीज संसारवृक्षाचे । मूळ कारण जे प्रपंचाचे । विपरीत त्या ज्ञानाचे । भांडारच की ॥८३॥
ब्रह्माच्या मूळ स्वरूपात । माया नाहीच बा दिसत । पण असते ती प्रकटत । ब्रह्माकारणे ॥८४॥
अर्जुना झोप ती येणं । मग जाणीव बा हारपणं । जसा प्रकाश मंदावणं । काजळी कारणे ॥८५॥
जसे स्वप्नी त्या प्रेयसीने । प्रियकरा आलिंगन देणे । मग दोहोंनी सकाम होणे । तैसे अर्जुना ॥८६॥
स्वरूपाचे विसरता भान । घडते मायेचे प्रकटन । तेच मुळाचं असणं । येथे अर्जुना ॥८७॥
वस्तूचे वस्तूशी विस्मरण । तेच बा बीजाचं असणं । प्रसिद्ध बीजभाव म्हणून । वेदांती अर्जुना ॥८८॥
<u>सुषुप्ति गहन अज्ञान । तेच बीज बा असणं । जागृती आणि स्वप्न । फळ तियेचे</u> ॥८९॥
ऐसे त्या वेदांतात । शब्द बा वापरतात । ते अज्ञानच बा असतं । मूळ येथे ॥९०॥
ऊर्ध्व तो आत्मा निर्मळ । तेथून प्रकटती ती मूळं । मग पसरतं सर्वत्र जाळं । मायेचं अर्जुना ॥९१॥
देह बा अगणित । खालच्या बाजूस प्रकटतात । आणि अंकुर फोफावतात । चौफेर त्यांना ॥९२॥
ऐसे ऊर्ध्व ब्रह्मापासून । होते मायेचे प्रकटन । मग अधोभागी अंकुरणं । घडे तेथे ॥९३॥
तेथे चिद्वृत्ती पहिलं । ते महत् तत्त्व प्रकटलं । जसा अंकुर तो कोमल । उगवला अर्जुना ॥९४॥
हा अंकुर जो अहंकार । तो प्रकटवी त्रिगुण अपार । मग वृक्ष पसरे खालीवर । सर्वत्र अर्जुना ॥९५॥
करता बुद्धिची डहाळी उत्पन्न । तेथे भेदाचे होते प्रकटन । आणि ओढाळ ते मन । टवटवी त्याला ॥९६॥
ऐसे मूळ मायेकारण । संकल्प विकल्प प्रकटन । आणि वृक्षाचं सर्वत्र वाढणं । घडे तेथे ॥९७॥
पंचभूतांच्या मदतीनं । गुण आकारांचं वाढणं । तेच जिवांचं भासणं । आहे अर्जुना ॥९८॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

पंचभूतांच्याच कारण । पंचज्ञानेंद्रियांचे प्रकटन । आणि अहंकार तो बळावणं । घडे तेथे ॥९९॥
शब्द-कानाची गाठ पडता । वाढते ती अहंकारता । मग वासना त्या फोफावता । घडे अनर्थ ॥१००॥
त्वचा स्पर्शाच्या कारण । विकारांचे प्रकटन । मग विकारात ते लोळणं । होई तेथे ॥१०१॥
रूप नेत्र एकत्र येत । मोह भ्रांतीस आणती ऊत । ऐसा वृक्ष असे वाढत । अर्जुना तेथे ॥१०२॥
रस जिभेची गाठ पडता । इच्छांची वाढ होता । संपते ती विवेकता । जिवाची अर्जुना ॥१०३॥
नाक सुगंधाच्या कारण । मोहाचं निर्माण होणं । जीव जातसे भुलून । तेव्हा अर्जुना ॥१०४॥
ऐसी देहबुद्धि घट्ट होता । चालते मनाचीच सत्ता । मग जन्ममरणाची कथा । चालते येथे ॥१०५॥
या अष्टधा प्रकृतीकारण । संसारवृक्षाचं प्रकटन । जसा रुप्याचा भास होणं । शिंपल्यावर ॥१०६॥
जेवढा सागराचा विस्तार । तेवढ्याच लाटा अपार । तैसे या वृक्षाचा प्रकार । ब्रह्माठायी ॥१०७॥
जसे त्या स्वप्नात । आपणच सर्व काही असे होत । तैसे ब्रह्मच होऊन जातं । विश्व अर्जुना ॥१०८॥
ऐसे त्या ब्रह्मात । कावरे झाड असे प्रकटत । आणि सर्वत्र असती वाढत । फांद्या त्याच्या ॥१०९॥
आणि अश्वत्थु ऐसे ययाते । का म्हणती जे जाणते । अर्जुना सर्व काही ते । ऐक आता ॥११०॥
अश्वत्थ म्हणजे अनित्य । जो सतत असे बदलत । नाहीच जो शाश्वत । ऐसा अर्जुना ॥१११॥
जैसे न लोटता क्षण । मेघ बदलतो नाना वर्ण । जसं विजेचं ते चमकणं । निमिषभर अर्जुना ॥११२॥
थरथरत्या कमळपानावर । थेंब पाण्याचा नाही थांबणार । तसे नसते स्थिर । चित्त अर्जुना ॥११३॥
तैसी ययाची स्थिती । बदलते क्षणाक्षणाप्रती । म्हणोनि ययाते म्हणती । अश्वत्थ अर्जुना ॥११४॥
आणि अश्वत्थु येणे नावे । पिंपळ म्हणती स्वभावे । परि तो अभिप्राय नोहे । श्रीहरीचा ॥११५॥
एऱ्हवी पिंपळ आणि संसार । फरक नाही फार । पिंपळा अश्वत्थाची सर । आहे अर्जुना ॥११६॥
तरी अश्वत्थ म्हणजे क्षणिकत्व । आपण घेऊ हाच अर्थ । क्षणोक्षणी असे जो नासत । तैसा अर्जुना ॥११७॥
तसेच हा अक्षय म्हणून । प्रसिद्ध फार असणं । पण ते गर्भीत अर्थानं । आहे अर्जुना ॥११८॥
जसा तो बा सागर । मेघांनी शोषला जातो वर । आणि नद्या टाकती पाण्याची भर । आणून अर्जुना ॥११९॥
तो नाही वाढत वा घटत । ऐसेच असे भासत । कार्य जोवरी नाही समजत । मेघ नद्यांचे अर्जुना ॥१२०॥
या वृक्षाचे होणे जाणे । न उमजते स्थूल दृष्टीने । म्हणून अव्यय म्हणणे । पडे यासी ॥१२१॥
जसे पुण्यशील पुरुषानं । बा दानधर्म करून । पुण्यसंचय करणं । तैसे अर्जुना ॥१२२॥
जसे वेगात चाकाचे फिरणे । मग स्थिर ते भासणे । तसे हा अव्यय वाटणे । आहे अर्जुना ॥१२३॥
तैसे या कालचक्रात । शाखा एखादी असे वाळत । पण करोडो अंकुर फुटतात । अर्जुना येथे ॥१२४॥
पण एक केव्हा असे जात । आणि करोडो केव्हा येतात । हे नसेच बा उमजत । अभ्राप्रमाणे ॥१२५॥
महाकल्पाच्या त्या शेवटी । संपून जाते ही सृष्टी । आणि नव्या सृष्टीची दाटी । उठते पुन्हा ॥१२६॥
संहारक त्या प्रलयात । विश्वेच नष्ट होतात । आणि नव्याने पुन्हा अवतरतात । येथे अर्जुना ॥१२७॥
उसाला कांडे फुटती । तसे मनु मागून मनु अवतरती । आणि वंशाची साखळी ती । चालते येथे ॥१२८॥
कलियुगाचा होता अंत । चारही युगे ती संपतात । मग कृतयुगाची सुरूवात । होते पुन्हा ॥१२९॥
दिवसामागून दिवस जाणं । वर्षामागून वर्ष संपणं । परि न रहाणे ते भान । याचे कोणा ॥१३०॥
जसा वाहणाऱ्या वाऱ्यात । सांधा नाही बा आढळत । तसा संसारवृक्ष असे वाटत । अखंड येथे ॥१३१॥
एका प्राण्याचा होतो अंत । पण अनेक प्राणी जन्मतात । म्हणून भवतरू असे भासत । अव्यय अर्जुना ॥१३२॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जसे पाणी वाहते वेगात । तसे जग असे बदलत । म्हणून अनित्य मानतात । संत याला ॥१३३॥
अर्जुना एका निमिषात । करोडो वेळा उदयव्यय असे होत । जसे तरंग ते उठतात । सागरामाजी ॥१३४॥
उदयव्यय न दिसल्यानं । नित्य आहे असं वाटणं । तेच भ्रमाचं कारणं । आहे अर्जुना ॥१३५॥
गतीच्या त्या कारण । भोवरा उभाच वाटणं । मग दिसे भूमीत रुतल्याप्रमाणं । तैसे अर्जुना ॥१३६॥
कोलीत फिरविता गरगर । ते भासते चक्राकार । तैसाच या वृक्षाचा कारभार । भ्रम अर्जुना ॥१३७॥
डोळ्यास नाही दिसत । उदयव्यय जो असे घडत । म्हणून अव्यय असे वाटत । हे विश्व अर्जुना ॥१३८॥
याला जो असे ओळखत । त्याच्या येते बा लक्षात । कोटी उदयव्यय निमिषात । होती येथे ॥१३९॥
मूळ याचे अज्ञान । म्हणून भ्रमाचं भासणं । याचे खोटेपण समजणं । ज्ञान अर्जुना ॥१४०॥
तयालाच मी पांडुसुता । सर्वज्ञ म्हणे जाणता । जयाने अनुभवली ब्रह्ममयता । अंतरात ॥१४१॥
ऐसा योग घडणे अंतरात । तयासीच होते ज्ञान प्राप्त । तयाचेच कारणे जिवंत । ज्ञान अर्जुना ॥१४२॥
या वृक्षाचे क्षणभंगुरत्व । अंतरी जो असे जाणत । कोणी का करू शकतं । वर्णन त्याचे ॥१४३॥
ऐसे या वृक्षानं । सर्वदूर बा पसरणं । आणि अफाट आपल्या विस्तारानं । माजतसे तो ॥१४४॥
फांद्या ज्या खाली जातात । तयांनाही मुळे फुटतात । आणि पालवी असे वाढत । तयांच्या वरती ॥१४५॥
सुरुवात ती करताना । मी सांगितले होते अर्जुना । तयाच्याच स्पष्टीकरणा । ऐकावे आता ॥१४६॥
मूळ असे अज्ञान । तेथून अष्टमायेचं उद्‌भवणं । मग जीवभावाचे अरण्य । पसरते येथे ॥१४७॥
आधी त्यातून स्वेदज । जारज उद्‌भिज अंडज । बुडातून निघती महाभुज । तेथे अर्जुना ॥१४८॥
मग त्या एकेकातून । चौऱ्यांशी लक्ष योनी प्रकटन । ऐसे अनंत जीव जन्मणं । घडे येथे ॥१४९॥
फांद्या त्या सरळ जातात । तयांना डहाळ्याही फुटतात । अशा अनेक प्रजाती प्रकटतात । येथे अर्जुना ॥१५०॥
स्त्री-पुरुष नपुंसक हे प्रकार । घेती येथे आकार । आणि चालतसे हा संसार । अखंडपणे ॥१५१॥
जसे त्या पावसाळ्यात । काळेकुट्ट ढग येतात । तसे प्राणी येथे प्रकटतात । अज्ञानात अर्जुना ॥१५२॥
मग स्वत:च्या वजनानं । फांद्या खाली जाती वाकून । नि त्रिगुणांचे प्रकटन । होई तेथे ॥१५३॥
ऐसे तेथे अचाट । गुण ते प्रकटतात । मग फाटे तीन फुटतात । तयासी अर्जुना ॥१५४॥
त्या रजोगुणाकारण । मनुष्य लोकाचं प्रकटन । नि गुणकर्माचं नांदणं । चाले येथे ॥१५५॥
त्या वृक्षाच्या मध्यात । फांद्या ज्या फुटतात । तेथे मनुष्य असे नांदत । मध्यभागी ॥१५६॥
विधिनिषेधात बा डोलत । वेद वाक्य ती बोलत । पाने तेथे फुटतात । नित्य नवी ॥१५७॥
अर्थकाम माजतात । कोंभ नवे फुटतात । आणि भोग ते पसरतात । सर्वत्र अर्जुना ॥१५८॥
प्रवृत्ति वाढल्याकारणे । लोभाचे ते बळावणे । नि कर्मकांडाचे वाढणे । घडे तेथे ॥१५९॥
अनेक भोग भोगून । देह जाता मग गळून । नवीन देहाचं जन्मणं । होई येथे ॥१६०॥
शब्द रंग घेऊन । नवनवीन विषयांचं प्रकटन । नित्य मोहात गुरफटणं । आहे तेथे ॥१६१॥
ऐसे रजोगुणाकारण । मनुष्यलोकाचं फैलावणं । नि संसारवृक्षाचं वाढणं । घडे अर्जुना ॥१६२॥
जेधवा रजोगुण ते ओसरती । तेथे तमोगुण प्रकटती । मग अनीतीची व्याप्ती । सर्वदूर ॥१६३॥
ऐसे मनुष्यलोकाच्या फांद्यांवर । वासना वाढती अपार । आणि कुकर्मांचा प्रसार । होई येथे ॥१६४॥
अप्रवृतीच्या रुपाने । तेथे कोंभ ते प्रकटणे । मग दोषांची डवरती पाने । बेहोषीत ॥१६५॥
विधिनिषेध दाखवीत । तिन्ही वेद येथे नांदतात । जी पालवीच असे झुलत । टोकावरी ॥१६६॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

मंत्रजारणमारण उपदेशून। कुप्रवृत्ती त्या वाढून। वासनांची वाढती रानं। अखंड येथे ॥१६७॥
ऐसे कुकर्म वाढते। अखंड भवचक्र ते चालते। नि अश्वत्था लाभते। चिरंजीवित्व अर्जुना ॥१६८॥
मग चांडाळादि हीन। निकृष्ट कर्मांचं प्रकटन। तेच फांद्यांचं वाढणं। अश्वत्थाच्या अर्जुना ॥१६९॥
पशु-पक्षी डुक्कर। विंचू सापांचे प्रकार। पसरती येथे अपार। अश्वत्थाठायी ॥१७०॥
ऐसा अश्वत्थ हा पांडवा। सर्वांगी नित्य नवा। नरकाच्या त्या गावा। जातसे अंती ॥१७१॥
अहंकाराच्या कारण। जन्ममरणाचं फोफावणं। आणि कर्मांचं होणं-जाणं। चालते येथे ॥१७२॥
ऐसे होती तरू तृण। डोह आणि पाषाण। गुण आकाराची ही खाण। अश्वत्थ अर्जुना ॥१७३॥
अर्जुना अशा या रीतीनं। मनुष्यलोकाचं होणं-जाणं। आणि चराचराचे प्रकटन। घडे येथे ॥१७४॥
म्हणुनी ही मनुष्य डहाळे। तीच जाणावी खालची मुळे। जेथुनी हा पघळे। संसार तरू ॥१७५॥
एऱ्हवी ते पहाता। मूळ ऊर्ध्वी आहे पार्था। पण अधोभागीची व्यवस्था। मनुष्याकारणे ॥१७६॥
सत्त्व आणि तमोगुण। चांगल्या वाईटाचं प्रकटन। ते मनुष्य शाखेच्याच कारण। आहे अर्जुना ॥१७७॥
तिन्ही वेदांचं ते असणं। ते मनुष्याच्याच कारण। त्यांना मनुष्यलोकावाचून। अस्तित्व नाही ॥१७८॥
म्हणून मनुष्याचे शरीर। तीच अश्वत्थ मुळे अपार। आणि कर्मांचा तो व्यापार। मनुष्याठायी ॥१७९॥
ऐसी अश्वत्थाची गत। जशा त्या फांद्या वाढतात। तशी मुळे खोल जातात। कर्माकारणे ॥१८०॥
तैसे अर्जुना हे शरीर। ते कर्मांचेच आहे घर। कर्मव्यापार बा निरंतर। देहाकारणे ॥१८१॥
म्हणून मनुष्याचे शरीर। तोच मुळांचा आधार। चालतो अश्वत्थाचा व्यापार। मनुष्याकारणे ॥१८२॥
संपता ते तमोगुण । स्थिरावता बा मन। सत्त्वगुणांचं प्रकटन। होई येथे ॥१८३॥
तेव्हा मनुष्याच्या मनी। प्रकटती सत्कृत्यांच्या खाणी। सदैव सत्कर्मांची उभारणी। घडे तेथे ॥१८४॥
सत्त्वाच्या त्या कारण। बुद्धि सात्त्विक होणं। मग सत्कर्म ते उपजणं। अनिवार्य की ॥१८५॥
शुद्ध होता मती। प्रकटते सात्त्विक स्फूर्ती। विवेकाची ती उपस्थिती। आढळे तेथे ॥१८६॥
सुबुद्धिच्या कारण। सत्कर्मीच रस असणं। तेथे सद्वृत्तीचे प्रकटन। आपोआप ॥१८७॥
सदाचार तो अंगीकारून। मुखी राहती वेद वचन। सदैव नामसंकीर्तन। चालते तेथे ॥१८८॥
होई ब्रह्मास्मिची घोषणा। जोर चढतो यज्ञ दाना। आचरणे पुण्यकर्मांना। घडे तेथे ॥१८९॥
ऐसे यमदम आचरून। तप घोर ते करून। जगणे वैराग्यशील जीवन। वृत्ती त्यांची ॥१९०॥
व्रतवैकल्य आचरून। मनी धीर तो धरून। जन्ममरणा ओलांडणं। ध्येय त्यांचे ॥१९१॥
सर्वत्र वेद यज्ञाचा घाट। अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्त्वगुण सोसाट। वाहू लागे ॥१९२॥
धर्माची वाढ होणे। अनेक पंथाचे जन्मणे। स्वर्गादिक फळे प्रकटणे। घडे तेथे ॥१९३॥
दिसे वरच्या टोकावर। मोक्षाची ती झालर। फोफावती साधनांचे प्रकार। अनेक तेथे ॥१९४॥
अनेक विद्यांचा प्रसार। परंपरा त्या अपार। नाना मतांचे प्रकार। मूळ घेती ॥१९५॥
इच्छांच्या त्या कारण। स्वर्गाचा लोभ धरून। देवादिकांचे पूजन। चालते तेथे ॥१९६॥
स्वर्गाच्याही वर। आहे तपस्व्यांचा वावर। मरीच कश्यपादि मुनीवर। तपती तेथे ॥१९७॥
ऐसा हा अपार। आहे अश्वत्थाचा प्रसार। लहान मध्यम थोर। शाखा जैशा ॥१९८॥
अश्वत्थाच्या शेंड्यावर। लागती जे फळभार। ब्रह्मा विष्णु शंकर। नावे त्यांची ॥१९९॥
फळांच्या त्या ओझ्याने। फांद्यांनी वाकून जाणे। आणि पुन्हा मुळांवर टेकणे। घडे तेथे ॥२००॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

अर्जुना या अश्वत्था जाण । जो वाकतो बा फळभारानं । या भवचक्रात अडकणं । अज्ञान आहे ॥२०१॥
जेथून हा आघवा । संसारतरूचा उठावा । तो मुळातच संपतो पांडवा । होता ज्ञान ॥२०२॥
ब्रह्म शिव जाणून । ब्रह्मी एकरूप होणं । तेच आहे ज्ञान । अर्जुना माझ्या ॥२०३॥
ब्रह्मदेवाही आत्मज्ञान । आहे अर्जुना कठीण । होणे स्वरूपाचे ज्ञान । सोपे नाही ॥२०४॥
आणखीही शाखा असतात । जया सनकादिक म्हणतात । त्या एकरूप होतात । ब्रह्मी अर्जुना ॥२०५॥
अशी वाढ भयंकर । घोर अश्वत्थाची अपार । आहे ब्रह्मदेवाच्या पार । ज्ञान अर्जुना ॥२०६॥
ब्रह्मदेवाचं असणं । मनुष्य लोकाच्याच कारण । मनुष्य अधोमूळ म्हणून । प्रसिद्ध आहे ॥२०७॥
असे पहा संपूर्ण । केले मी अश्वत्थ कथन । वर खाली शाखा असणं । वैशिष्ट्य ज्याचे ॥२०८॥
आता कशा त्या रितीनं । टाकता येतो हा उपटून । ते बा लक्ष देऊन । ऐक अर्जुना ॥२०९॥
वृक्ष ऐसा प्रचंड गहन । कसा टाकता येईल उपटून । ही शंका मनी येणं । स्वाभाविक अर्जुना ॥२१०॥
अश्वत्थाचे मूळ निर्गुण । जेथून विश्वाचे प्रकटन । दाही दिशांना पसरणं । शाखांनी त्याच्या ॥२११॥
अगदी खालच्या नरकाला । भासे हा पसरला । म्हणती मध्यभागीच्या मुळाला । मनुष्यलोक ॥२१२॥
इतका असे जो बळकट । कैसा होईल त्याचा शेवट । ही शंका तुझ्या मनात । न येवो अर्जुना ॥२१३॥
संपवण्या या वृक्षाचा पसारा । न लागती प्रयत्न जरा । असतो का कधी खरा । बागुलबुवा अर्जुना ॥२१४॥
जसे गंधर्वनगरी पाडण्या । सशाचे शिंग मोडण्या । फूल आकाशाचे तोडण्या । न लागती प्रयत्न ॥२१५॥
जो मुळातच नाही खरा । तेथे न लागती प्रयत्न जरा । उमजून घेणे या तरूवरा । सूत्र आहे ॥२१६॥
वर्णन केले जे वर । मी अश्वत्थाचे तोंडभर । ती वांझेचीच लेकरं । असती अर्जुना ॥२१७॥
झोपेतून जाग येता । संपते स्वप्नाची कथा । तैसे ज्ञान ते होता । विरे अश्वत्थ ॥२१८॥
सत्य जर हा असता । मग कधीच संपला नसता । आणि जन्ममरणाची व्यथा । संपतीच ना ॥२१९॥
मग याला ते उपटणे । न ते कधीच बा घडणे । नष्ट का होते फुंकीने । गगन कधी ॥२२०॥
असणे या अश्वत्थाचे । नाहीच बा ते साचे । जसे तूप ते कासवीचे । असत्य अर्जुना ॥२२१॥
मृगजळाच्या त्या पाण्यानी । लावल्या का केळी कोणी । तैसे अश्वत्थाची उभारणी । भ्रम अर्जुना ॥२२२॥
मूळ जे अज्ञान । तेचि बा असत्य असणं । तयाचे कार्य कैसे होईन । सत्य अर्जुना ॥२२३॥
अश्वत्थास नाही अंत । असं जे म्हटलं जातं । तेही खरंच असतं । असता भ्रम ॥२२४॥
जाग न येई जोपर्यंत । तोवरी नाही निद्रेस अंत । रात्र का कधी असे सरत । न उगवता सूर्य ॥२२५॥
तैसे न प्राप्त होता ज्ञान । अश्वत्था न येते मरण । माया जातसे संपून । ज्ञान होता ॥२२६॥
जोवरी वारे वाहतात । तोवरीच लाटा उठतात । तैसे असता अज्ञानात । उठती भ्रम ॥२२७॥
सूर्य तो मावळता । संपते मृगजळाची सत्ता । तैसे अज्ञान ते संपता । संपती भ्रम ॥२२८॥
तैसे मूळ माया जे जिरवते । ते ज्ञान जेधवा उपस्थित होते । तेव्हाच अज्ञान संपते । अन्यथा नाही ॥२२९॥
अनादि या शब्दात । अर्थ हाच असे वसत । नाहीच जयाची सुरुवात । झाली कधी ॥२३०॥
या वृक्षाचा पसारा । खोटाच भ्रम सारा । नसे जरासाही खरा । हा वृक्ष अर्जुना ॥२३१॥
जो नाहीच अस्तित्वात । त्यालाच अनादि म्हणतात । भ्रम जैसा स्वप्नात । भासतो अर्जुना ॥२३२॥
जो बा जन्मलाच नाही । त्याची असते का कधी आई । तैसा हा वृक्ष जराही । नसे सत्य ॥२३३॥
जसे त्या वांझेनं । मुलाची जन्मपत्रिका काढणं । तितकेच असत्य असणं । हे जग अर्जुना ॥२३४॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

आकाशपुष्पाचा पांडवा । देठ कैसा तोडावा । तैसेचि या भवा । आदि नाही ॥२३५॥
जैसे घटाचे ते नाहीपण । आहे स्वयंसिद्ध स्वत:हून । तैसे वृक्ष समूळ जाण । अनादि हा ॥२३६॥
अर्जुना तू ऐसे पाही । यास आदि अंत नाही । मध्यंतरी आभासे जो काही । तो भ्रम अर्जुना ॥२३७॥
ब्रह्मगिरीहून न निघणं । आणि समुद्रीही न मिळणं । मध्यंतरी जसे दिसणं । मृगजळ अर्जुना ॥२३८॥
तैसे जया आदि अंत नाही । पण भासते काही बाही । ती भासाचीच नवलाई । आहे अर्जुना ॥२३९॥
जैसा इंद्रधनुष्याचा आकार । नि तो सप्तरंगांचा प्रकार । तैसा अज्ञानात हा संसार । भासतो अर्जुना ॥२४०॥
केवळ आभासाचा प्रकार । आहे अर्जुना हा संसार । जैसा नट तो चतुर । भ्रमवी प्रेक्षका ॥२४१॥
तैसे ते निळेपण । नसूनही आकाशी भासणं । तैसेच या वृक्षाचं असणं । आहे अर्जुना ॥२४२॥
जैसे त्या स्वप्नात । स्वप्न खरे असे वाटत । तैसे बा अज्ञानात । भासते विश्व ॥२४३॥
जसे त्या पाण्यात । प्रतिबिंब असे दिसत । ते का सत्य असतं । कधी अर्जुना ॥२४४॥
तैसे भासाचे होणे जाणे । विद्युल्लताही तेथे हारणे । इतके क्षणिक असणे । विश्वाचे अर्जुना ॥२४५॥
वाहतो वावटळीचा वारा । न समजे समोर की पाठमोरा । तैसी स्थिरता या तरूवरा । नसे अर्जुना ॥२४६॥
जया नाही आदि अंत । जो असे केवळ भासत । तया उपटण्याची खटपट । व्यर्थ अर्जुना ॥२४७॥
अहंकार अज्ञानाच्या कारणे । नसूनही तयाचे भासणे । म्हणून अहंकार अज्ञान निरसणे । सूत्र आहे ॥२४८॥
एका आत्मज्ञानावीण । अन्य उपाय करणं । ते संसारवृक्ष वाढवणं । आहे अर्जुना ॥२४९॥
जर फांद्या तू तोडशील । वर खाली हिंडशील । मग भवचक्रीच अडकशील । अर्जुना माझ्या ॥२५०॥
मारण्या दोराचा साप । काठ्या जमवणे अमाप । तो वावुगाच ताप । जैसा अर्जुना ॥२५१॥
जाण्या मृगजळा नदी तरून । पुरातून लाकडे काढणं । मग पुरातच वाहून जाणं । तैसे अर्जुना ॥२५२॥
संपवण्या हा संसार । येथे उपायांची नाही जरूर । करणे प्रयत्नांचा वार । अपाय येथे ॥२५३॥
जसे संपण्या ते दु:स्वप्न । जागणेचा उपाय असणं । तैसे अर्जुना आत्मज्ञान । उपाय येथे ॥२५४॥
मनइंद्रियांसी तादात्म्य तुटता । अंतरी वैराग्य प्रकटता । मगच ती ब्रह्ममयता । अनुभवा येते ॥२५५॥
जसे कुत्र्याचे वमन । करेल का कोणी सेवन । तैसे मनइंद्रिये व्यर्थ वाटणं । सूत्र अर्जुना ॥२५६॥
अवघ्या मनइंद्रियांच्या अनुभवा । जो विटून जातो पांडवा । तोच त्या ब्रह्मभावा । होतसे प्राप्त ॥२५७॥
मनइंद्रियांशी तादात्म्य तुटता । स्वप्न-सुषुप्तीत जागता । मगच ती ब्रह्ममयता । प्रकटते अंतरी ॥२५८॥
मनी विवेक प्रकटता । अनुभवा येते ब्रह्ममयता । अहंकार तो विरता । मोक्ष अर्जुना ॥२५९॥
पहावा प्रयत्न तो करून । मग द्यावा तो सोडून । विरून जाणे मन । सूत्र आहे ॥२६०॥
अंतरी समज येता । प्रकटते ती ब्रह्ममयता । मग अवघीच ती द्वैतता । जातसे विरून ॥२६१॥
ऐसे होता आत्मज्ञान । येते अद्वैताची जाण । मग अश्वत्थ जाई संपून । आपोआप ॥२६२॥
जसे शरदाचे होता प्रकटन । अभ्रे आपसूक जाती विरून । तैसे होता आत्मज्ञान । विरतसे वृक्ष ॥२६३॥
जैसे झोपेतून जागता । संपते स्वप्नभ्रमांची सत्ता । तैसे आत्मज्ञान होता । विरते द्वैत ॥२६४॥
मग संपे वरचे ते मूळ । नि खालचे ते शाखा जाळ । दिसते का बा मृगजळ । चांदण्यात कधी ॥२६५॥
ऐसे बा अर्जुना । प्राप्त होता आत्मज्ञाना । संसारवृक्षाची ती विवंचना । संपून जाई ॥२६६॥
आत्मज्ञान ते होता । संपते द्वैताची सत्ता । सर्वत्र मग ब्रह्ममयता । अनुभवा येते ॥२६७॥
परि दर्पणाचेनि आधारे । एकचि करून दुसरे । मुख पहाती गव्हारे । तैसे नको ॥२६८॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

आत्मतत्त्वाचा ऐसा हा प्रकार । जैसे न खोदता विहीर । उगमीच असे स्थिर । झरा जैसा ॥२६९॥
जैसे पाणी ते आटता । संपते ती प्रतिबिंबता । वा घट तो फुटता । उरे आकाश ॥२७०॥
जैसे सरता ते इंधन । अग्नी जातसे विझून । तैसे अवधानी अनुभव संपणं । सूत्र आहे ॥२७१॥
जिभेने आपलीच चव चाखणे । डोळ्याने डोळ्यास पहाणे । अवधानी अनुभव संपणे । सूत्र अर्जुना ॥२७२॥
ठिणगी अग्नीत मिसळणे । घटाकाश आकाशात विरणे । नदी सागरात एकरूप होणे । तैसे अर्जुना ॥२७३॥
ब्रह्म ते होऊन । आपणच आपणास जाणणं । तेच आहे ज्ञान । अर्जुना माझ्या ॥२७४॥
पाहणाऱ्यावीण पाहणे । जे मनइंद्रियांस जाणे । तेच पुरुष या नावाने । प्रसिद्ध अर्जुना ॥२७५॥
शब्दांचा घेऊन आधार । श्रुतींनी भरविला बाजार । नामरूप आणि आकार । नसे तेथे ॥२७६॥
स्वर्ग सिद्धींना जे उबगले । तेच योगाकडे वळले । अंती आत्मज्ञाना पावले । येता समज ॥२७७॥
अंतरीच्या इच्छा सोडून । मनइंद्रिय तादात्म्य तोडून । सर्व कर्म ते त्यागून । होती ज्ञानी ॥२७८॥
स्वप्न सुषुप्ति ओलांडणे । मूळ अहंकाराचे संपणे । तेच ज्ञान प्राप्त होणे । आहे अर्जुना ॥२७९॥
अर्जुना जेथून एवढी । भासाची प्रकटते लबाडी । ती इच्छाच आहे कोरडी । दुर्दैव अर्जुना ॥२८०॥
या इच्छेच्याच कारण । अहंकाराचं अस्तित्व भासणं । मी-तू-पणाचा भास होणं । इच्छेकारणे ॥२८१॥
सर्व इच्छा त्यागून । आपणच मूळ वस्तू होऊन । आपली भेट आपण घेणं । सूत्र आहे ॥२८२॥
आणिकही एक तया । ओळखणं आहे धनंजया । वस्तू ती भेटलीया । नुरे अहंकार ॥२८३॥
त्या वस्तूची भेट होता । सर्वत्र आढळते ब्रह्ममयता । जैसे प्रलय तो होता । सर्वत्र पाणी ॥२८४॥
ज्या पुरुषाचे मन । सांडोनि गेले मोह मान । सोडती वर्षांती जैसे घन । आकाशा ते ॥२८५॥
निकवड्या निष्ठुरा । उबगतो जैसा सोयरा । तैसा तो त्या अहंकारा । उबगून जाई ॥२८६॥
फळली केळी उन्मळे । तैसे आत्मज्ञानाच्या बळे । अहंकाराचे तोंड काळे । आपोआप ॥२८७॥
आग लागता वृक्षा ती । पक्षी झाड सोडून जाती । तैसे संकल्प विकल्प सांडती । ज्ञान होता ॥२८८॥
सकळ दोषांचं अंकुरणं । ते अहंकाराच्या कारण । अहंकाराचं संपता भासणं । नुगवती दोष ॥२८९॥
त्या सूर्योदयासरसी । रात्र पळोनी जाय आपैसी । जाते देह अहंता तैसी । अविद्येसवे ॥२९०॥
संपता ते आयुष्यमान । जीव जाई शरीर सोडून । तैसे द्वैत अज्ञान । सरे तेथे ॥२९१॥
लोहाचे वैर परिसा । न जाणे अंधार रवि जैसा । द्वैत बुद्धीचा तैसा । दुष्काळ तेथे ॥२९२॥
द्वैताच्याच कारण । सुखदु:खाचं ते भासणं । होता द्वैताचे उच्चाटन । सुखदु:ख नाही ॥२९३॥
स्वप्नीचे राज्य का मरण । नाही हर्षशोकासी कारण । जैसे स्वप्न ते संपणं । येता जाग ॥२९४॥
जैसे त्या गरुडावरती । सर्प आक्रमण न करती । तैसे सुखदु:खे ती । नुरती तेथे ॥२९५॥
जैसे त्या राजहंसाने । दूध पाणी वेगळे करणे । तैसा आत्मज्ञाने । मुक्त हा ॥२९६॥
मनप्रक्रिया जाणून । साक्षीत स्थिर होऊन । स्वप्न सुषुप्तीत जागून । मुक्त होई ॥२९७॥
अज्ञानाच्या कारण । होतं द्वैताचं भासणं । अंतरी प्रकटता ज्ञान । द्वैत कैचे ॥२९८॥
होता ते आत्मज्ञान । द्वैत जाते ते संपून । सागरी एकरूप होणं । नदीने जैसे ॥२९९॥
जाणता आपले ब्रह्मपण । इच्छांची होते बोळवण । जसे येथून पलीकडे जाणं । आकाशा नाही ॥३००॥
जसे भाजता अग्नीत । बीज नसे अंकुरत । तैसे विकार न उद्भवतात । मनी त्याच्या ॥३०१॥
थांबवता मंदार मंथन । सागरानं स्थिर होणं । तैसे इच्छांचं उठणं । थांबते तेथे ॥३०२॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

पौर्णिमा ती येता । संपूर्ण सोळा कला प्रकटता । न उरते अंधारता । चंद्राठायी ॥३०३॥
किती करू हे वर्णन । वाऱ्यापुढे न टिकती कण । तैसे इच्छांची भणभण । नुरे तेथे ॥३०४॥
प्रकटता ते आत्मज्ञान । द्वैत जातसे विरून । मग ते ब्रह्मी एकरूप होऊन । ब्रह्म होती ॥३०५॥
केवळ ब्रह्म ब्रह्म म्हणून । न प्रकटते अर्जुना ज्ञान । चारही वाचा विरणं । अनिवार्य आहे ॥३०६॥
अंतरी जाणल्याविण । न समजते ब्रह्मपण । स्वयेचि ब्रह्म होणं । सूत्र आहे ॥३०७॥
जसे दिव्याच्या कारण । वस्तू त्या दिसणं । वा जसे सूर्याच्या कारण । दिसतसे जग ॥३०८॥
तैसे जयाच्या कारण । इंद्रियांना होते ज्ञान । ती जाणीव अर्जुना जाण । ब्रह्म आहे ॥३०९॥
जेधवा रुपेपण हारपते । तेधवाच शिंपली दिसते । तैसे जेधवा अज्ञान संपते । प्रकटते ज्ञान ॥३१०॥
जरी चंद्र सूर्य थोर । त्यांना ब्रह्माचाच आधार । म्हणून तळपती अपार । येथे अर्जुना ॥३११॥
ब्रह्म सर्वांची बा खाण । ब्रह्माठायीच नामरूप प्रकटन । सर्व विश्वाचं भासणं । ब्रह्माकारणे ॥३१२॥
ऐसी जी तेजोराशी । जी सर्व विश्वा प्रकाशी । म्हणती बा तयाशी । ब्रह्म अर्जुना ॥३१३॥
प्रकटता ते ब्रह्मज्ञान । हारपते अर्जुना मी-तूपण । जसे नक्षत्रांचं लोपणं । सूर्योदयी ॥३१४॥
जसे जागता झोपतून । मावळती अर्जुना स्वप्न । वा मृगजळाचं संपणं । संध्याकाळी ॥३१५॥
तैसे त्या वस्तूच्याठायी । द्वैताचा आभास नाही । तेच माझे निजधाम पाही । अर्जुना माझ्या ॥३१६॥
जे ब्रह्ममय झाले । त्यांचे अहंकार निवाले । जसे सागरी एकरूप झाले । स्त्रोत अर्जुना ॥३१७॥
जसे लवणाच्या हत्तीणीची कथा । समुद्रात ती टाकता । उरतो का कधी पत्ता । अर्जुना तिचा ॥३१८॥
जाता अग्नी ज्वाला आकाशात । नाहीच त्या परतत । जसे पाणी नसे उरत । होता वाफ ॥३१९॥
तैसे मजसी एकरूप होता । अंतरी ज्ञान प्रकटता । जन्ममरणाची ती कथा । संपून जाई ॥३२०॥
उपदेश देवाचा ऐकून । विचारता झाला अर्जुन । म्हणे सांग मला समजावून । भगवंता आता ॥३२१॥
देवासी जे एकरूप होती । मग मागुती न येती । ते देवासी भिन्न असती । की अभिन्न देवा ॥३२२॥
जरी भिन्नचि अनादिसिद्ध । तरी न येती हे असंबद्ध । जसे फुलांजवळ षट्पद । षट्पदच राहती ॥३२३॥
जसे त्या निशाणाहून । भिन्न असती देवा बाण । आणि लक्ष ते छेदून । रहाती भिन्न ॥३२४॥
जर सर्व विश्व तू स्वभावे । मग कोणी कोणा मिळावे । कैसे पाण्यात पाण्याने रहावे । न मिसळता देवा ॥३२५॥
जर जीव असे अभिन्न । मग संयोग वियोग कुठून । जसं अवयवांचं असणं । शरीराठायी ॥३२६॥
जे सदा वेगळे तुजसी । तया मेळणी घडेलच कशी । मग येण्या जाण्याची काशी । वायाच की ॥३२७॥
तरी कैसे ते गा तूते । पावोनि न येती माघौते । हे तुझे म्हणणे ते । समजव मजसी ॥३२८॥
प्रश्न अर्जुनाचा ऐकून । देव गेला संतोषून । पाहून अर्जुनाचे शहाणपण । प्रसन्न झाला ॥३२९॥
मग म्हटलं त्या देवानं । जे न परतती एकरूप पावून । ते भिन्न आणि अभिन्न । दोन्ही अर्जुना ॥३३०॥
खोलात विचार करता । माझी त्यांची अभिन्नता । वरवर विचार करता । भासती भिन्न ॥३३१॥
जसे त्या पाण्यात । तरंग वेगळे भासतात । एऱ्हवी पाणीच असे बनत । तरंग अर्जुना ॥३३२॥
अलंकार का कधी सोन्याहून । अर्जुना असती भिन्न । अलंकार आणि सोनं । अभिन्नच की ॥३३३॥
तैसे होता आत्मज्ञान । उमजते अंतरी अभिन्नपण । अन्यथा भासते वेगळेपण । अज्ञानाकारणे ॥३३४॥
करता खरा विचार । मीच ब्रह्म बा अपार । द्वैत कैसे संभवणार । ब्रह्माठायी ॥३३५॥
अर्जुना जर त्या सूर्यानं । सर्व ब्रह्मांड टाकलं व्यापून । मग सूर्याच्या प्रतिबिंबानं । प्रकटावे कोठे ॥३३६॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

---

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

---

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

---

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे ह्दगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान®

www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळयांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०